epaper.lokmat.com/ar...
epaper.lokmat.com

लोकमत

न्यूज Inbox

# कृषी महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम

धुळे: धुळे कृषी महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे आयुक्त अजीज शेख, जिल्हा वनसंरक्षण अधिकारी माणिक भोसले, नगर रचनाकार महेंद्र परदेशी, सार्वजनिक आरोग्य अधिकारी चंद्रकांत जाधव हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर होते.

Hello Dhule
Page No. 1 Jul 08, 2021
Powered by: erelego.com

लोकमत
Feedba

# धुळे कृषी महाविद्यालयात वनमहोत्सव

## वसंतराव नाईक जयंतीनिमित्त उपक्रम; दहा हजार झाडे जगविण्यात यश

**सकाळ वृत्तसेवा**



**धुळे : कृषी महाविद्यालयात वनमहोत्सवांतर्गत वृक्षलागवड करताना अजीज शेख, माणिक भोसले, डॉ. चिंतामणी देवकर व मान्यवर.**

धुळे, ता. ७ : कृषी महाविद्यालयात हरित क्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक जयंतीनिमित्त वनमहोत्सव सप्ताह झाला. वृक्षलागवडीचे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून महत्त्व पटवून द्यावे व जास्तीत जास्त वृक्षांची लागवड, संगोपन होण्यासाठी हा सप्ताह झाला. त्यानिमित्त विविध उपक्रम राबविले.

कृषी महाविद्यालयाच्या परिसरात महापालिका आयुक्त अजीज शेख, जिल्हा वनसंरक्षण अधिकारी माणिक भोसले, नगररचनाकार महेंद्र परदेशी, सार्वजनिक आरोग्य अधिकारी चंद्रकांत जाधव प्रमुख पाहुणे होते. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. या वर्षी विविध प्रजातींची एकूण ८०० रोपांची लागवड होणार आहे. त्यात बांबू, कडूनिंब, सीताफळ, जांभूळ, चिंच व औषधी वनस्पतींचा समावेश आहे. तसेच यापूर्वी वृक्षारोपण केलेल्या सुमारे १२ हजार झाडांपैकी सुमारे दहा हजार (८५ टक्के) झाडे यशस्वीरीत्या जगविलेली आहेत, असे डॉ. देवकर यांनी सांगितले.

आयुक्त शेख यांनी प्रदूषण कमी होण्यासाठी आणि निसर्गचक्र सुरळीत राहण्यासाठी वृक्षलागवडीचे महत्त्व विशद केले. कृषी महाविद्यालयाच्या उपक्रमांबाबत समाधान व्यक्त केले. कोविड १९, प्लॅस्टिकमुक्ती अभियान, वसुंधरा अभियानासारख्या उपक्रमांमध्ये कृषी महाविद्यालयाने दिलेल्या योगदानाबाबत आयुक्तांनी आभार मानले. श्री. भोसले यांनी वृक्षलागवड आणि संवर्धनाचे आवाहन केले. महाविद्यालयातील डॉ. एस. पी. सोनवणे, डॉ. सुनील भणगे, डॉ. सी. व्ही. पुजारी, डॉ. एम. एस. महाजन, डॉ. जी. बी. काबरे, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ. पी. डी. सोनवणे, डॉ. खुशाल बराटे, डॉ. राहुल देसले, डॉ. टी. डी. पाटील, डॉ. डी. एच. कंखरे, सहाय्यक कुलसचिव व्ही. टी. पाटील, डॉ. संदीप पाटील, डॉ. डी. आर. नांद्रे आदी उपस्थित होते. डॉ. संदीप निकम यांनी आभार मानले.

# धुळे कृषी महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम

**धुळे** | धुळे कृषी महाविद्यालयात हरितक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री, स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपण करण्यात आले. प्रमुख पाहुणे मनपा आयुक्त अजिज शेख, जिल्हा वन संरक्षण अधिकारी माणिक भोसले, नगररचनाकार महेंद्र परदेशी, सार्वजनिक आरोग्य अधिकारी चंद्रकांत जाधव हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. चिंतामणी देवकर होते.

# वनमहोत्सव सप्ताह; कृषी महाविद्यालयात वृक्षारोपण



कृषी महाविद्यालयात वृक्षारोपण करताना पदाधिकारी.

**प्रतिनिधी** | धुळे

हरितक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी महाविद्यालयात १ ते ७ जुलै हा कालावधी वनमहोत्सव सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने मनपा आयुक्त अजिज शेख यांच्या हस्ते कृषी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी जिल्हा वन संरक्षण अधिकारी माणिक भोसले, नगररचनाकार महेंद्र परदेशी, सार्वजनिक आरोग्य अधिकारी चंद्रकांत जाधव उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे होते. त्यांनी सांगितले की, कृषी महाविद्यालयाच्या वतीने विविध प्रजातींची ८०० रोपांची लागवड करण्यात येणार आहे. त्यात बांबू, कडुनिंब, सीताफळ, जांभूळ, चिंच व औषधी वनस्पती यांचा समावेश आहे. तसेच यापूर्वी वृक्षारोपण केलेल्या १२ हजार झाडांपैकी दहा हजार झाडे जगवण्यात आल्याची माहिती दिली. या वेळी प्रा. डॉ. एस. पी. सोनवणे, प्रा. डॉ. सुनील भणगे, डॉ. सी. व्ही. पुजारी उपस्थित होते.